## द्राक्षमळ्यातील कामकरणार्यांचा दाखला मती २०:१-१६

म्हणून स्वर्गाचे राज्य कोण एका घरधन्या सारखे आहे; तो आपल्या द्राक्ष मळ्यात मोलाने कामकरी लावावयास मोठ्या पाहाटेस बाहेर गेला;

आणि त्याने कामकऱ्याना रोजचा रुपया ठरवून त्यांना आपल्या द्राक्ष मळ्यात पाठवले.

मग ते तिसऱ्या तासाच्या सुमारास बाहेर गेला आणि त्याने बाजारपेठात कित्तेकांना रिकामी उभे राहिलेले पहिले.

तो त्यांना म्हणाला, तुम्हीही द्राक्षमळ्यात जा, जे योग्य ते मी तुम्हास देईल; आणि ते गेले.

पुनः सहाव्या व नवव्या तासाच्या सुमारास त्याने बाहेर जाऊन तसेच केले.

मग अकराव्या तासाच्या सुमारास तो बाहेर गेला तेव्हा आणखी कित्तेक उभे राहिलेले त्याला आढळले.त्यांना त्याने म्हटले,तुम्ही सारा दिवस येथे रिकामी का उभे राहिला आहात?

ते त्याला म्हणाले आम्हास कोणी कामावर घेतले नाही म्हणून. त्याने त्यांना म्हटले तुम्हीही द्राक्षमळ्यात जा.

मग संध्याकाळ झाल्यावर द्रक्ष्मल्याचा धनी आपल्या कारभाऱ्याला म्हणाला , कमकऱ्याना बोलाव आणि शेवटल्यापासून आरंभ करून पहिल्या पर्यंत त्यांना मजुरी दे.

तेव्हा ते अकराव्या तासाच्या सुमारास लाविले होते ते आल्यावर त्यांना रुपया रुपया मिळाला.

मग जे पहिले आले त्याना आपल्याला अधिक मिळाले असे त्यांना वाटले. तरी त्यांनाहि रुपया रुपयाच मिळाला.

तो त्यांनी घेतल्यावर घरधन्याविरुद्ध कुरकुर करीत म्हटले,

ह्या शेवटल्यांनी एकाच तास काम केले,आम्ही दिवसभर उन्हातान्हात कष्ट केले आणि आम्हास व त्यास आपण सारखे लेखिले.

तेव्हा त्याने त्यातील एकाला उत्तर दिले, गाड्या, मी तुझा अन्याय करीत नाही; तू माझ्याबरोबर रुपयाचा ठराव केला कि नाही?

तू आपला रुपया घेऊन चालायला लाग;जसे तुला तसे ह्या शेवटल्यालाहि द्यावे अशी माझी इच्छा आहे;

जे माझे आहे त्याचे मी आपल्या मर्जीप्रमाणे करावयास मुखत्यार नाही काय?अथवा मी उदार आहे हे तुझ्या डोळ्यात सतले काय?

ह्याप्रमाणे शेवटले ते पहिले आणि पहिले ते शेवटले होतील.